# INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SOCIOLOGY & HUMANITIES

**ISSN 2277 – 9809 (online)**
**ISSN 2348 - 9359 (Print)**

*An Internationally Indexed Peer Reviewed & Refereed Journal*

www.IRJMSH.com
www.isarasolutions.com

Published by iSaRa Solutions

# सणांचा राजा - श्रावण

**प्रोफेसर डॉ.सौ.अरुणा रविंद्र वाघोले.**

सहयोगी प्राध्यापक, इतिहासविभाग प्रमुख.

मा.बाळासाहेब जाधव क, वा,

वि.महाविदयालय

आळे, ता.जुन्नर. जि .पुणे.

(महाराष्ट्र) ४२२४११.

aruna.123w@gmail.com

**प्रास्ताविक :**

भारतीय संस्कृती महान आहे. भारतातील विविध राज्यातील त्यांचे सण, चालीरिती, रूढी, परंपरा यातून विविधतेतून एकता भारतीय समाजात, संस्कृतीत दिसते. प्रामुख्याने मराठी महिने चैत्र, वैशाख, जेष्ठ, आषाढ, श्रावण, भाद्रपद, आश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष, पौष, माघ, फाल्गुन इ. बारा महिन्यात काहीना काही सण असतात. ते आवडीने साजरे केले जातात. हे सर्व सण, उत्सव करण्यामागे काही उद्देश आढळतात.

उद्देश-

१) धार्मिकता जपणे.

२) संस्कृतीचे संस्कार एका पिढीकडून भावी पिढीकडे देणे.

३) वारसा संक्रमण व संवर्धन करणे. भारतातील राज्यातील सर्वांच्या मनोभावना जपणे धर्म, आचार, विचार, संस्कार, नीतिमत्ता समजून देणे हा महत्त्वाचा "वारसा जतन"

४) धार्मिक स्थळे, पर्यटन स्थळे, किल्ले, मठ, मंदिरे यातून ही संस्कृती सणांचा वारसा पुढे देण्यासाठी उपयुक्त उपक्रम घेतले जातात.

५) भारतीय ज्ञान प्रणालीद्वारे नवे शैक्षणिक धोरण राबवितांना सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांसाठी विविध कौशल्ये विकसित करण्यासाठी हा विषय महत्वाचा आहे.

६) पर्यटन, रोजगार, फुलांचा व्यवसाय, शेती व्यवसाय, फुलबाग व्यवसाय, रोपवाटिका, विविध फुलांची सजावट, इव्हेंट मॅनेजमेंट (डोहाळे जेवण, बारसे (नामकरण विधी), वाढदिवस, विवाह वाढदिवस, सहस्रचंद्रदर्शन सोहळा, नवरात्र, खेळ पैठणीचा इ. साठी रोजगार निर्मितीसाठी) इ. उद्देश राबवविले जातात.

**सणांचा राजा – श्रावण :**

वसंत ऋतूत झाडांना नवीन पालवी फुटते आणि वर्षा ऋतूत फुले बहरतात तो हा सणांचा श्रावण राजा. यात विविध सण साजरे केले जातात. उदा. पारसी पतेती, नागपंचमी, मंगळागौरी पुजन, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, श्रीकृष्ण जन्माष्टमी, गोपालकाला, श्रावणी पोळा इ. महत्वाचे सण असतात. ते आनंदाने साजरे केले जातात. याच श्रावण महिन्यात महाराष्ट्रात विविध घराघरात धार्मिक ग्रंथांचे वाचन, पारायण असे अध्यात्मिक पर्व राबवविले जाते. उदा. श्री गुरुचरित्र, शिवलीलामृत, नवनाथसार ग्रंथाचे वाचन, ज्ञानेश्वरी ग्रंथाचे

वाचन व पारायण केले जाते. यातूनच कीर्तन, प्रवचन आयोजित केले जाते. समाजातील लोक श्रावणी सोमवार उपवास, श्रावणी शनिवारी उपवास करतात.

श्रावणात निसर्ग प्रसन्न झालेला असतो. पावसाळा ऋतू असतो. पावसाच्या सरीवर सरी सारख्या चालू असतात. श्रावणी सोमवारचे उपवास,, यात्रा भेटी देणे, बारा ज्योतिर्लिंगांचे दर्शन केले जाते. G- जनरेशन, O- ऑर्गनायझेशन, D- डेथ GOD ब्रम्हा, विष्णू, महेश यांची उपासना होते.

श्रावण महिन्यात तर महेश, शंकर, भोलेनाथ, सदाशिव, महादेव इ. विविध नावांनी जागर, उपवास, जप, प्रदक्षिणा केल्या जातात. मंदिरांना भेट दिली जाते. महादेव लवकर प्रसन्न होतो. मंदिरात पहाट पासून जलाभिषेक, रुदाभिषेक, पंचामृताभिषेक केले जातात. पानाफुलांची सजावट मोठ्या प्रमाणात केली जाते. कारण धरणी माता श्रावणात हिरवा शालू पांघरते. सर्वत्र ठिकाणी डोंगरदऱ्या, पर्वत, नद्या, तळी, ओढे, नाले इत्यादी ठिकाणी पाणी असते. त्यामुळे सर्वत्र माती, धरणीवर गवत, झाडे, फुले, पाने यांचा बहर दिसतो. विशेषत: श्रावणात बेल, तुळस, केवडा, जास्वंदी, सोनचाफा, परिजातक, गणेशवेल, डोंगरी फुले, लाजाळूची फुले सर्वत्र बहरतात. फुलांची सजावट, गंध, धुप, दीप, पंचामृत, नारळ, पेढे यांची मंदिराभोवती दुकाने सजलेली असतात. चहा-कॉफी, राजगिरा लाडू इ. मंदिरांच्या परिसरात हर हर महादेव, जय शंकर भोलेनाथ बाबा की जय च्या घोषणा करतांना दिसतात. तसेच श्रावण मासारंभी उत्साह हा विविध गीते, कविता, गाणे यातून प्रकट होताना दिसतात.

१- श्रावण मासी हर्ष मानसी.......... कविता
२- श्रावण आला, श्रावण आला......... गाणे
३- हासरा नाचरा जरासा लाजरा सुंदर साजिरा श्रावण आला......... गाणे
४- हिरवे हिरवे लाल गालिचे.......... कविता - कुसुमाग्रज
५- चल गं सये वारुळाला जाऊ..........
६- पंचमीचा सण आला डोळे माझे ओले.......... माहेरवाशीणीचे गाणे

नागपंचमी सणाच्या निमित्ताने माहेरवाशीणी माहेरी आलेल्या असतात. वारुळाला भेटायला जातात. नागोबाला लाह्या, मुरमुरे, दूध, फुले, पाने वाहतात. भक्ती भावनेने पूजा करतात. झोके खेळतात. फिरतात, फुगड्या खेळतात, गाणी म्हणतात, संपूर्ण दिवस आनंदी आनंद असतो. ग्रामीण भागात मात्र आहारात कानुले करतात. तवा वापरत नाहीत. श्रावण महिन्यात घराघरात नाग नरसोबाचा फोटो लावतात. प्रत्येक सोमवारी हार घालतात. नागोबा शेतकऱ्यांचा खरा मित्र त्याचे पूजन हे वारुळाच्या ठिकाणी होते. असा हा श्रावण सणांचा राजा महनीय सण आहे.

**बारा ज्योतिर्लिंग:**

| क्र. | ज्योतिर्लिंगाचे नाव | ठिकाण | जिल्हा / राज्य |
|---|---|---|---|
| १ | सोमनाथ ज्योतिर्लिंग | प्रभास पाटण, | सौराष्ट्र, गुजरात |
| २ | मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग | श्रीशैलम | आंध्र प्रदेश |
| ३ | महाकालेश्वर ज्योतिर्लिंग | उज्जैन | मध्य प्रदेश |
| ४ | ओंकारेश्वर ज्योतिर्लिंग | मांधाता बेट | मध्य प्रदेश |
| ५ | केदारनाथ ज्योतिर्लिंग | केदारनाथ | उत्तराखंड |
| ६ | भीमाशंकर ज्योतिर्लिंग | खेड | पुणे, महाराष्ट्र |
| ७ | काशी विश्वनाथ ज्योतिर्लिंग | वाराणसी (काशी) | उत्तर प्रदेश |
| ८ | त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग | त्र्यंबक (नाशिक) | नाशिक, महाराष्ट्र |
| ९ | वैद्यनाथ ज्योतिर्लिंग | परळी वैजनाथ | महाराष्ट्र |
| १० | नागेश्वर ज्योतिर्लिंग | द्वारका | गुजरात |
| ११ | रामेश्वर ज्योतिर्लिंग | रामेश्वरम | तामिळनाडू |
| १२ | घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग | वेरूळ, छ. संभाजीनगर | महाराष्ट्र |

यातुन श्रावण महिन्यात आहार, विहार, उपासना, पर्यटन, धार्मिकता आणि आर्थिक विकासाची उलाढाल होते. छोटे व्यापारी, दुकानदार, मोठे विक्रेते सर्वांचाच फायदा या श्रावण महिन्यात होतो

पर्यटन वारसा जतन, फुलांची आरास करणे, फुले, पाने, बेलफळ विकणे यातून आर्थिक लाभ होतो. पानाफुलांचा वापर करून अमाप स्वरूपात उमललेली पाने, फुले, फळे यांच्या वापरातून विविध सण समारंभात पानाफुलांची सजावट केली जाते. त्यातूनही भक्ती जोपासली जाते. उपासना कलाकृती दिसते. श्रावणात सरीवर सरी पावसाच्या चालू असतात. धरणीमाता हिरवा शालू पांघरते. सर्वत्र डोंगर, नद्या, शेती इ. तळी, धबधबे पाण्यांनी ओसंडून वाहतात. हिरवाई नटलेली असते. सर्वत्र निसर्गमय वातावरणात आनंदी आनंद असतो. पावसाळा पाऊस पडतो. धरणी माता शांत होते, शेतकरी सुखावतो, श्रावणात शेतकरी आनंदी असतो. आषाढापूर्वी पेरणी झालेली असल्याने शेतात पीक बहरू लागतात. पाने, फुले उमलतात. झाडांना फुलांचा बहर येतो, फळे येतात. पशुपक्षी आनंदाने किलबिलाट करतात. पारिजातक, गुलाब, मोगरा, सोनचाफा, कण्हेर, रुईची फुले,जास्वंद, जाई, जुई इ. फुले भारतात फुलांचा सडा पडतो. बेलाचे झाड, बेलाची पाने, बेलाचे फळ, तुळस, माका इ. फुले बहरतात. फुलांचा सुगंध सर्वत्र सतत दरवळत असतो. दूध, दही, तूप, जल यांचा अभिषेक महादेवाला करतात. अत्तरे, धूप, नारळ, केळी, शेंगा, ड्रॅगन फ्रुट, सफरचंद यांचाही आस्वाद सतत सर्वत्र चालू असतो. त्याचबरोबर फुलांचे आरास करताना दिसतात.

भाद्रपद महिना लागला की गौरी गणपतीचे आगमन होतेच. पेपरमध्ये नुकतेच याच काळातील विविध फुलांची माहिती देणारे सदर सुरू झाले. सकाळ वृत्तपत्र सतत वेगवेगळे उपक्रम राबवीत असते, त्यापैकीच फुल- फुलांची नावे, त्यांची महती रामायण- महाभारत प्राचीन काळ ते आजच्या काळातील फुलांचा प्रवास कसा झाला याबद्दल छान माहिती देतात. वनस्पतीशास्त्र विषयाचा तो अत्यंत महत्त्वाचा सौंदर्यवृद्धी करणारा, सुगंध देणारा, महत्त्व वाढवणारा, रोजगाराची नवनवीन संधी देणारा चिरंतन असा सुयोग्य मार्ग आहे. त्यासाठी निसर्गाकडे मागणी अर्ज करावा लागत नाही. पाण्याची सोय करावी लागत नाही, तसेच जमीन, माती, शेत, कामगार यांचा पुरवठाही लागत नाही, तर ती ऋतुमानानुसार निसर्गतः श्रावण, भाद्रपद, अश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष या महिन्यात देवांना हवी असणारी पूजेसाठी पाने- फुले आपोआप मिळतात. फक्त माणसाने त्यांचा शोध घेणे, योग्य वापर करणे हे महत्त्वाचे आहे. ही नैसर्गिक देणगी मानवाने

जतन केलीच पाहिजे. त्यावर संशोधन करून त्यांचा भावी पिढीसाठी वारसा जतन केला जाईल याबाबत मनापासून आवडीने अभ्यास करावा असे वाटते. यातूनच एका मुलाने / पुत्राने आपल्या वडिलांचा छंद आवड पूर्णत्वास नेण्यासाठी फुलांची सजावट कशी करावी यातून छंद जोपासला व तो नातवंडांनी कसा अंगीकारला ते समजून घेऊया.

१)



२)




३)



४)



५)



६)



७



८)




९)



१०)



११)



१२)



१३)



१४)



१५)



१६) १७) १८) १९) २०)








२१) २२) २३) २४) २५)







२६) २७) २८) २९) ३०)




२६) २७) २८) २९) ३०)

३१)



३२)




३३)



३४)



३५)



३६)



३७)



३८)



३९)



४०)



| क्र. | सजावट | क्र. | सजावट | क्र. | सजावट |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री गणेश | ६ | श्री. गुरुदेव दत्त | ११ | श्री. गणेशाची सोंड |
| २ | श्री गणेश | ७ | स्वस्तिक | १२ | पोपट |
| ३ | श्री विठ्ठल-रखुमाई | ८ | लोकमान्य टिळक | १३ | आरास |
| ४ | श्री विठ्ठल | ९ | फुलांचा चौकोन | १४ | सायकल |
| ५ | श्री विठ्ठल- रखुमाई | १० | फुलांची सजावट | १५ | सजावट |

वरील प्रमाणेच पाने, फुले, कर्दळ, सोनचाफा, पारिजातक, जास्वंदी, गणेशवेल, माका यांचा वापर करून फुले, सायंकाळ फुले, रांगोळी, वारली पेंटिंग, दिवा, झाड, फुले इ. अशी छान छान सजावट केली आहे.

यातून NEP स्किल कौशल्य विकसित करताना घराच्या अवतीभोवती सापडणारी पाने, फुले यांचा वापर करून सजावट डेकोरेशन इव्हेंट मॅनेजमेंट यातून आपली कला विकसित करू शकतात. उदाहरनिर्वाह साधन, रोजगार संधी उपलब्ध करण्यास हातभार लागतो. कला कौशल्य असतात ती यातून विकसित होतात.

**निष्कर्ष:**

या २०२६ च्या श्रावण महिन्यात सणांची रेलचेल दिसते. पारसी पतेती, नागपंचमी, मंगळागौरीपुजन, नारळी पौर्णिमा, श्रीकृष्ण जन्माष्टमी, गोपाळकाला, पोळा इ. सण येतात. या सर्व सणांना सर्वच गोष्टींचे महत्त्व असते. आर्थिकदृष्ट्या हा धनवान करणारा, मनसोक्त आनंद देणारा, शेतकरी, प्राणी, पक्षी, सासर, माहेर, भाऊ-बहीण, कृष्ण, राधा, भक्ती, गोपाळकाला, दहीहंडी आणि बैलपोळा असा हा सण श्रावण राजा सणांचा राजा. सर्वांना सुंदर नटवणारा, सजवणारा, नाचवणारा, देहभान हरपून भक्तीरसात तल्लीन करणारा, पशु-पक्षी, प्राणी, मानव, देव-देवता, निसर्ग, शेतकरी, व्यापारी, दुकानदार, वाहतूकदार, एसटी ते विमानसेवा सर्वांना मनसोक्त यथाशक्ती पावणारा हा श्रावण महिना आहे.

**मंदिराच्या बाजूचे आर्थिक धोरण:**

भाविक मंदिरात भक्तीभावाने, नवसाने, प्रेरणेने आणि पर्यटनाच्या दृष्टीने या प्रत्येक धार्मिक मंदिरात येतात, भेटतात. यामुळे गाडी पार्किंगवाले, फळ, प्रसाद, वस्तू, खेळणी, पुस्तके, विक्रेते, चप्पल स्टॅंड, पाणी, व्यवसाय, गंध लावणारी मुले, पूजेची साहित्य विकणारे, गार्ड, पुजारी, सफाई कर्मचारी, मंदिराचा जिर्णोद्धार करणारा गवंडी आणि त्यांचे सहकारी, हॉटेल मालक, छोटे-छोटे स्टॉल चालवणारे मंदिर परिसरातील या सगळ्या छोटया -मोठया व्यवसायिकांची उदरनिर्वाहाची ही प्रामुख्याने साधने आहेत. आर्थिक उलाढाल ही १ रुपयापासून ते हजार रुपयांपर्यंत होते. याकडे आपण आर्थिक व्यवसाय, अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने पहावे ही चांगली गोष्ट आहे. रोजगाराचे एक साधन आहे.

**तळटीपा आणि संदर्भग्रंथ:**


१) दैनंदिन वृत्तपत्र सकाळ

२) दैनंदिन वृत्तपत्र लोकसत्ता

३) दैनंदिन वृत्तपत्र लोकमत

४) निसर्गनिर्मित फुले

५) स्वतः अंगणातील झाडांची पाने, फुले जमा करून केलेली सजावट

६) जैवविविधता एक दिवसीय आंतरराष्ट्रीय अंतर्विद्याशाखीय परिषद, उत्कर्ष प्रकाशन.
प्रकाशक- गोविंद शंकर वाघमारे, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) ऑक्टो. २०२५. पृ. क्र. १४८, १४९

# ISARA INSTITUTE OF MANAGEMENT & PROFESSIONAL STUDIES




RESEARCH GATEWAY







AROGYAM ONLINE

# PARIVARTAN PSYCHOLOGY CENTER






**भारतीय भाषा, शिक्षा, साहित्य एवं शोध**

**ISSN 2321 – 9726**

**WWW.BHARTIYASHODH.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SCIENCE & TECHNOLOGY**

**ISSN – 2250 – 1959 (0) 2348 – 9367 (P)**

**WWW.IRJMST.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF COMMERCE, ARTS AND SCIENCE**

**ISSN 2319 – 9202**

**WWW.CASIRJ.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SOCIOLOGY & HUMANITIES**

**ISSN 2277 – 9809 (0) 2348 - 9359 (P)**

**WWW.IRJMSH.COM**

**INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF SCIENCE ENGINEERING AND TECHNOLOGY**

**ISSN 2454-3195 (online)**

**WWW.RJSET.COM**

**INTEGRATED RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT, SCIENCE AND INNOVATION**

**ISSN 2582-5445**

**WWW.IRJMSI.COM**

**JOURNAL OF LEGAL STUDIES,POLITICS AND ECONOMICS RESEARCH**

**WWW.JLPER.COM**